**MHNS160000402014**

## आदेश नि.क्रं. ०५ खाली
## दिनांक ०२/०९/२०२५

१. वादींनी सदरचा दावा खरेदीखत रद्द होवून, जाहीर ठराव करुन मिळणेसाठी व निरंतरच ताकिद हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादींनी दावा मिळकत ति-हाईत इसमास विकू नये अथवा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध उत्पन्न करु नये, दावा मिळकतीवर कोणतेही बांधकाम करु नये, तसेच दावा मिळकतीवरील वादींच्या कब्जा वहिवाटीला हरकत, अडथळा येईल असे कोणतही कृत्य करु नये यासाठी नि.क्रं. ०५ खाली वाद मिळकतीतील संदर्भात तात्पुरता ताकीद मनाई हुकूम मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

२. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मिळकतीचे वर्णन - तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका चांदवड पैकी मौजे उर्धूळ गांवाचे शिवारातील शेत मिळकत यांसी गट क्रं. ४०३ यांसी क्षे हे.०.४३ आर + पो. ख ०हे. १०आर असे एकूण क्षेत्र ०हे.५३ आर यांसी आकार रु.०.६९ पैसे यांसी चतु: सिमा खालीलप्रमाणे :-

**पुर्वेस** : गट क्रं. ४०२

**दक्षिण** : गट क्रं. रस्ता

**पश्चिम**: गट क्रं. ४०४

**उत्तर**: गट क्रं. ४०२

येणेप्रमाणे सामाईक वागवहिटीचे व जल, तरु, काष्ट, पाषाण निधीः निक्षेपसह चतुः सिमाकित असलेली दरोबस्त मिळकत.

सदर मिळकतीस या पुढे स्पष्टता येण्याकरीता दावा मिळकत म्हणून संबोधण्यात येत आहे.

३. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी हे मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांचे वारस आहेत. मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिस एक मुलगा नामे मयत विष्णु एकनाथ ठाकरे व मुली श्रीमती दगुबाई खंडु शिंदे व मयत मुलगी रक्माबाई छबु कोल्हे असे मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे व एकनाथ लक्ष्मण ठाकरे यांची अपत्य होती. मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांचे पतिचे दिनांक २५/०१/१९७१ रोजी मौजे पंचक ता. जि. नाशिक येथे नोकरी करत असतांना निधन झलेले आहे. मयत एकनाथ लक्ष्मण ठाकरे यांचे वडिलोपार्जित मिळकतीवर पत्नी सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे, मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे, मुली रक्कमाबाई छबु कोल्हे व दगुबाई खंडू शिंदे अणी नांवे रेकॉर्ड ऑफ राईटसला नोंद क्रं. ७६ प्रमाणे झालेली होती. परंतु मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे, मुली रक्कमाबाई छबु कोल्हे व दगुबाई खंडु शिंदे यांनी त्यांचा हक्क सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे लाभात नोंद नंबर ७८ प्रमाणे सोडुन दिलेला होता. तेव्हापासुन दावा मिळकत ही सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे कब्जे वहिवाटीत होती. मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे हा दिनांक ३/१०/२००२ रोजी मौजे दसक ता. जि. नाशिक येथे मयत झालेला आहे. त्याचप्रमाणे वादी क्रं. १ ही मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिची सुन असून वादी क्रं. २ ते ४ हे मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे नातु व वादी क्रं.५ ते ७ नाती आहेत. वादी क्रं. ८ ही मयत सोनुबाई (सोन्याबाई) एकनाथ ठाकरे हिची मुलगी असुन वादी क्रं. ९ हे सोनुबाई (सोन्याबाई) एकनाथ ठाकरे हिच्या मुलीचे वारस आहेत. अशाप्रकारे वादी क्रं. १ ते ९ सोनुबाई (सोन्याबाई) एकनाथ ठाकरे हिचे कायदेशीर वारस आहेत. वादी हे वंशपरंपरेनुसार व हिंदु वारसा कायदा १९५६ चे तरतुदींनुसार पहिल्या वर्गातील वारस आहेत. दावा मिळकत वादीच्या प्रत्यक्ष कब्जात होती असे कथन केल आहे.

४. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे दिनांक ०८/११/२००८ रोजी मौज दसक नाशिकरोड येथे निधन झालेले आहे. मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांना वारस म्हणून एक मुलगा व दोन मुली वारस होते. त्यापैकी मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे हा दिनांक ०३/१०/२००२ रोजी मयत झलेला आहे मुलगी रक्कमाबाई छबु कोल्हे ही दिनांक ३१/०५/२०१० रोजी मौजे खेडे ता. निफाड जि. नाशिक येथे मयत झालेली आहे व श्रीमती दगुबाई खंडेराव शिंदे ही हयात आहे. मयत मुलास ३ मुले व ३ मुली व पत्नी आहेत. सदरच्या दाव्यात वादी न.१ ते ७ हे मयत विष्णु एकनाथ ठाकरे यांचे कायदेशीर वारस आहेत असे कथन केले आहे.

५. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हे दिनांक ०८/११/२००८ रोजी मयत झालेली आहेत. त्यांचे हयातीत त्यांचे नावांवर मौजे उर्धुळ ता. चांदवड जि. नाशिक येथे वर कलम १ यात वर्णन केलेली दावा मिळकत होती व आहे. मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांनी त्यांचे हयातीत कोणतेही मृत्यूपत्र करुन ठेवलेले नव्हते व नाही असे कथन केले आहे.

६. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांचे मृत्यूनंतर त्यांचे मिळकतीबाबत दावा मिळकतीस वारस रेकॉर्डवर लावलेले नव्हते. जेव्हा वादी मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटस्ला वारस नोंद करण्यास गेले तेव्हा वादीचे मिळकतीमध्ये प्रतिवादींनी बराच मोठा फेरफार व बोगस दस्तऐवज करुन नोंदी करुन घेतलेल्या आढळुन आलेल्या आहे असे समजले तेव्हा वादींनी कागदपत्राचे नक्कला घेण्यासाठी अर्ज दिले व नक्कला घेतल्यावर कलम १ यात वर्णन केलेल्या

दावा मिळकतीमध्ये वादीचा निम्मा हिस्सा आहेत असे कथन केले आहे.

७. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, अशी परिस्थिती असतांना प्रतिवादी क्रं. १ ने दावा मिळकतीचे फरोक्त खरेदीखत प्रतिवादी क्रं. २ अ चे पती व २ ब ते २ क चे वडील कचरु लक्ष्मण ठाकरे यांचेशी संगणमत करून खोटे व फोर्ज दस्त मे दुय्यम निबंधक, चांदवड यांचे कार्यालयात दिनांक २९/१२/१९९७ रोजी कायमचे फरोक्तखरेदीखत दुय्यम निबंधक यांची दिशाभुल करुन नोंदवून घेतलेला आहे. सदरच्या फरोक्त खरेदीच्या दस्तास प्रतिवादी क्रं. ३ व ४ ने खोटी ओळख देवुन दावा मिळकतीचे वादीचे निम्म्या हिस्स्याचे बिन भरण्याचे खरेदीखत नोंदविलेले आहे. सदर दस्तऐवजाअन्वये प्रतिवादी क्रं. १ व २ चे मयत पुर्वज यांनी बरीच खोटी माहिती दर्शवून व संगणमत करुन वादीचे पुर्वज म्हणजेच मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे या सदर दिवशी मे. चांदवड येथील दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात हजर नसतांना हजर दाखवुन सदरचा खोटा दस्तऐवज नोंदविलेला आहे. सदरच्या दस्तऐवज नोंदविणे कामी डम्मी स्त्रीस मे दुय्यम निबंधक सो. चांदवड यांचे समोर हजर ठेवुन सदरचा खोटा फरोक्त खरेदीचा दस्त नोंदविलेला आहे. सदरचा दिनांक २९/१२/१९९७ रोजीचा दस्तऐवज हा या दाव्याचा विषय आहे. सदर दस्तऐवजाचे अवलोकन केले असता सदरचा दस्तऐवज कसा बनावट, खोटा आहे हे दिसून येईल. सदरच्या दस्तऐवजात मयत सोनुबाई (सोन्याबाई) ही हयात असतांना तिचे जागी अन्य स्त्रीला उभे करून सदरचे दस्त दुय्यम निबंधकाची दिशाभुल करुन सदरचा दस्त नोंदविलेला आहे. सदर दस्तऐवज नोंदविणेकामी प्रतिवादी क्रं. १ ला प्रतिवादी क्रं. ३ व ४ ने मदत केली आहे म्हणुन प्रतिवादी क्रं. ३ व ४ ला दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट केलेले आहे. प्रतिवादी क्रं. १ ने उर्धुळ विविध कार्यकारी सोसायटीकडुन कर्ज घेणेकामी डिक्लरेशन नोंदवुन सदरचा बोजा दावा मिळकतीवर दाखल केलेला असल्यामुळे प्रतिवादी क्रं. ५ या दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट केले आहे. वादीची म्हणजेच सोनुबाई (सोन्याबाई)

एकनाथ ठाकरे हिची खोटी ओळख मे. दुय्यम निबंधक सो. चांदवड यांचे समोर देवुन सदरचा दस्त नोंदविलेला आहे. सदरचा दस्त नोंदविणेकामी प्रतिवादी क्रं. १, ३ ते ४ व २ चे पुर्वजांनी व्यक्तीने संगनमत करुन मे. दुय्यम निबंधक सो. चांदवड याची दिशाभुल करुन सदरचा बनावट दस्त स्वतःचे फायद्याकरिता प्रतिवादी क्रं. १ ने नोंदवून घेतलेला आहे. दावा मिळकतीची वादींना म्हणजेच मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांना कधीही विक्री करावयाची नव्हती व त्यांचे कुंटूंबावर आर्थिक अडचणीची परिस्थिती निर्माण झालेली नव्हती व नाही. परंतु सदर दस्तऐवज प्रतिवादी क्रं. १, प्रतिवादी क्रं. २ अ ते २ ड व प्रतिवादी क्रं. ३ ते ४ ने सगनमत करुन बोगस व बिन भरण्याचा दस्त स्वतःचे फायद्याकरिता प्रतिवादींनी नोंदविलेला आहे. दावा कलम १ यातील मिळकतीमध्ये वादीचा निम्मा हिस्सा असल्याने सदरचे खोटे व बोगस दस्तऐवज वादीवर बंधनकारक नाहीत असे ठरवून मिळणेसाठी सदरचा दावा वादीस दाखल करणे भाग पडले आहे असे कथन केले आहे.

८. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २९/१२/१९९७ रोजीच्या दस्तऐवजात जी माहिती दर्शविली आहे ती खोट्या स्वरुपाची असून सदरच्या बनावट व खोट्या सह्या अंगठे करून सदरचे दस्तऐवज नोंदविण्यात आलेले आहे. वादीच्या मिळकतीची अफरातफर प्रतिवादी क्रं. १ व २ चे पुर्वज यांनी स्वताःचे फायद्याकरिता केलेली आहे. वर नमुद प्रकरणावरून असे स्पष्ट होते की प्रतिवादी क्रं. १ ते २ चे पूर्वज यांनी खोटी माहिती सादर करुन खोटे, बनावट दस्त नोंदवून घेतलेले आहे व दावा मिळकतीचे बोगस दस्तान्वये फेरफार करुन स्वताचा फायदा करुन घेतलेला आहे. दावा मिळकतीमध्ये वादीचा निम्मा हिस्सा आहे. प्रतिवादी क्रं. १ने केलेले खरेदीखत वादीचे हिस्सेवर बंधनकारक नाही असे कथन केले आहे.

९. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २९/१२/१९९७ चा कायम खरेदीचा दस्त रु २०००/– मुल्यांकनाच्या स्टॅम्प

पेपरवर करण्यात आलेला आहे तो स्टॅम्प पेपर मयत कचरू लक्ष्मण ठाकरे म्हणजेच प्रतिवादी क्रं. २ अ ते २ ड चे पुर्वजांचे नावाने घेवुन सदर स्टॅम्प पेपरचा वापर करुन दस्ताऐवज नोंदविणेकामी प्रतिवादी क्रं. १ ला मदत केलेली आहे असे दिसून येते आहे. तसेच दिनांक २९/१२/१९९७ रोजीच्या कायम खरेदीखतावर वादीचे सासुबाई नामे सोनुबाई (सोन्याबाई) यांचे ऐवजी दुसऱ्या स्त्रीस उभे करुन सदर व्यक्ती ही सोनुबाई (सोन्याबाई) एकनाथ ठाकरे अशी ओळख प्रतिवादी क्रं. ३ व ४ ने दिलेली आहे. त्याचप्रमाणे साक्षीदार म्हणून ज्यांनी सह्या केलेल्या आहेत ते साक्षीदार क्रं. १ श्री. ठाकरे राजाराम रमण क्रं. २ चे साक्षीदार श्री. गोरख फकिरा ठाकरे हे मौजे उर्धुळ ता. चांदवड जि.नाशिक येथील रहिवाशी असुन त्यांनी सदर दस्तावर साक्षीदार म्हणून सहया केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे श्री. भाउसाहेब भागुजी खुटे व नामदेव रखमा ठाकरे मौजे उर्धुळ ता.चांदवड जि.नाशिक यांनी मे दुययम निबंधक साो. यांचे समोर लिहून देणार क्रं. १ व त्यासोबत असलेल्या स्त्रीने असे भासविले की लिहून देणार क्रं.२ म्हणुन मीच सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे आहे अशी खोटी ओळख देवुन सदरचे दस्त ऐवज दुययम निबंधक साो. चांदवड यांना नोंदविणे भाग पडले आहे. सदरचे दस्तऐवज लिहून घेणार यांना कोणताही अधिकार, हक्क दस्ताऐवजाने पोहचत नाही. या सर्व गोष्टी संबंधित दुय्यम निबंधक साो. चांदवड यांचेपासुन लपवून ठेवून त्यांना खोटी व चुकीची माहिती सादर करुन त्यांनी वादातील दस्तऐवज खोटेपणाने, संगणमताने तयार करुन नोंदवून घेतले आहेत असे कथन केले आहे.

१०. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, अशा रितीने विषयात नमूद सर्व प्रतिवादींनी आपसात संगनमत करुन वादातील दस्तऐवज तयार करून तो नोंदविला आहे. वादी हे मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांचे कायदेशीर वारस आहेत. वादातील मिळकत ही मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांचे पश्चात वादींच्या

मालकीची व कब्जे वहिवाटीची झाली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे वादी हे मयत सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांची सुन, मुलगी, नातु व नाती अशी रक्ताचे नाते संबंध असलेली वारसदार ठरतात. दावा मिळकत ही प्रतिवादी क्रं. १ ने खोटा व बनावट दस्तऐवज करुन सदर दस्ताचा बेकायदेशीर अमंल घेवुन बेकायदेशीरपणे वादींच्या म्हणजेच दावा मिळकतीवर कब्जा वहिवाट केलेली आहे व मालकी हक्काने दावा मिळकतीचा ते उपभोग घेत आहेत. वादातील दस्तऐवजांमुळे वादीच्या सदरच्या हक्कास बाधा पोहचत आहे. सबब, सदर दस्तऐवजात हरकत घेण्याचा वादींना अधिकार आहे असे कथन केले आहे.

११. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रं. १, २ अ ते २ ड चे पुर्वज व प्रतिवादी क्रं.३ ते ४ ने आपसात संगनमत करुन वादींना आर्थिक नुकसान पोहचविण्यासाठी व त्यांची वर नमुद मालमत्ता खोटेपणाने, लबाडीने हडप करण्याच्या हेतूने वर नमूद केल्याप्रमाणे खोटे व बनावट दस्तऐवज तयार करुन संगनमताने सदरचे दस्तऐवज नोंदविलेला आहेत. सदर दस्तऐवजाव्दारे प्रतिवादी हे दावा मिळकतीत त्यांना नसलेले हक्क प्रस्थापित करुन खोटेपणाने व लबाडीने प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादींनी सदरची कृत्ये ही वादींची तसेच संबंधित सरकारी अधिकारी व आमजनता यांची फसवणूक करण्याच्या हेतून केलेली असुन त्याव्दारे त्यांनी वादींची नोंदणी अधिकाऱ्यांची फसवणूक केलेली आहे. प्रतिवादींनी तयार केलेला वादातील दस्तऐवज हा "फोर्ज डॉक्युमेंट" आहे व तसा असल्याची माहिती प्रतिवादी क्रं. १ ते ४ ला असतांना सुध्दा प्रतिवादींनी सदरचा दस्त खरा जेन्यूअन म्हणून पुराव्याचे कामी वापरलेला आहे व वापरीत आहेत. वादातील दस्त तयार करण्याचे व नोंदवून घेण्याचे कामी प्रतिवादींनी व त्यांना मदत करणाऱ्या प्रतिवादी क्रं. ३ ते ४ ने खोटी ओळख पटविली म्हणजेच आपसात संगनमत करुन हेतुपुरस्कर रित्या व ते नमुद करीत असलेला उल्लेख/मजकूर खोटा व चुकीचा आहे हे माहित असतांनासुध्दा खोटे व दिशाभुल करणारे दस्त नोंदविण्यासाठी सहया, अंगठे ओळखत नसतांना खोटया

स्वरुपाची ओळख देवुन प्रतिवादी क्रं.१ ते २ यांना मदत केलेली आहे. खोटा व बनावट दस्त नोंदणी अधिकारी यांचेसमोर सादर करून नोंदवुन घेवुन त्याचा बेकायदेशीर कृत्यांसाठी वापर केलेला आहे व करत आहेत असे कथन केले आहे.

१२. प्रतिवादी दाव्यात हजर झाले असून त्यांनी नि. क्रं. २४ प्रमाणे दाव्याला, सदरच्या अर्जाला जबाब दिलेला आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादींचा दावा व मनाई अर्ज खरा नाही, कायदेशीर नाही व तो या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबूल नाही. वादींचे दाव्यातील व तुर्तातुर्त मनाई अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असा असून तो या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबूल नाही असे कथन केले आहे.

१३. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा व मनाई अर्ज दाखल करणेस कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण घडलेले नसलेनेही वादींचा दावा व मनाई अर्ज कायद्याने चालत नाही म्हणूनही तो रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१४. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादींचा हल्लीचा दावा दि.२९/१२/१९९७ रोजीचे नोंदी व खरेदीखता पासून ३ वर्षांचे मुदतीचे आत व सोनुबाई एकनाथ ठाकरे वादींचे कथनाप्रमाणे सन २००८ सालात मयत झाली तेव्हा पासून देखील ३ वर्षांचे मुदतीचे आत वादींचा दावा व मनाई अर्ज नसलेले वादींचे हल्लीचे दाव्यास व मनाई अर्जास मुदतीचे कायद्याची बाधा येते म्हणूनही वादींचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१५. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील मिळकत गट क्रं. ४०३ ही मिळकत मयत सोनूबाई उर्फ द्रौपदाबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची अशी होती. सदरची मिळकत मयत सोनूबाई द्रौपदाबाई एकनाथ ठाकरे व कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी विक्रीसाठी काढली व दावा मिळक्तीची कायम फरोक्त खरेदीची रक्कम रुपये ४०

हजार इतकी ठरली त्याप्रमाणे दि.२९.१२.१९९७ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवून देणेसाठी साक्षीदारासमक्ष मयत सोनूबाई एकनाथ व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे हे चांदवड येथे आले व दावा मिळकतीची सरकारी किंमत रक्कम रुपये ५० हजार इतकी निघाली त्या रकमेवर प्रतिवादी क्रं. १ हिने स्टॅम्प भरुन मयत कचरु लक्ष्मण ठाकरे व सोनूबाई एकनाथ ठाकरे यांनी साक्षीदारासमक्ष खरेदीचा दस्त लिहिणारास माहिती दिली व त्यावरुन दस्त लिहिणार यांनी खरेदीखताचा दस्त मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व कचरु लक्ष्मण ठाकरे यांचे सांगणेप्रमाणे व दिलेले माहिती प्रमाणे लिहिला व तो लिहून झाले नंतर साक्षीदारासमक्ष कचरु लक्ष्मण ठाकरे व सोनूबाई एकनाथ ठाकरे यांना वाचून दाखविला व त्यांचे सांगणेप्रमाणे व दिलेले माहितीप्रमाणे खरा व बरोबर असलेने व सोनूबाई एकनाथ ठाकरे व कचरु लक्ष्मण ठाकरे यांना खरेदीची किंमतीची रक्कम रुपये ४० हजार प्रतिवादीकडून साक्षीदारासमक्ष रोख मिळालेली असलेने तशी किंमत मान्य व कबूल करुन सदरचे खरेदीखतावर मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी सही केली व मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे यांनी साक्षीदारासमक्ष अंगठा केला व त्यानंतर सदरचे खरेदीखत दुय्यम निबंधक साो, यांचे कार्यालयात दस्त क्रं. १८४५/१९९७ प्रमाणे नोंदवून दिला व सदरचे खरेदीखता वरुन प्रतिवादी क्रं. १ हिचे नावाने दावा मिळकतीचे रेकॉर्डला फेरफार नोंद क्रं. ९९९ चौकशी अंती मंजूर झालेली आहे. दि.२९/१२/१९९७ रोजीची खरेदीखताचे लेखाने प्रतिवादी क्रं. १ ही दावा मिळकतीची बोनाफाईड पर्चेसर अशी कायदेशीर मालक झालेली असून दि.२९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखतापासून दावा मिळकतीशी मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांचा अथवा त्यांचे मृत्यूनंतर वादी व प्रतिवादी क्रं. २ चे वारसांचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध राहिलेला नव्हता व नाही असे कथन केले आहे.

१६. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, दि.२९/१२/१९९७ रोजी दावा मिळकत मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे

यांनी प्रतिवादी क्रं. १ हिस कायम फरोक्त खरेदीने देऊन मिळकत प्रत्यक्ष कब्जात दिलेवर मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी त्यांचे हयातीत कधीही दि.२९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखताबाबत कधीही वाद उपस्थित केलेला नव्हता व नाही व त्यांचे मृत्यूनंतर वादी व प्रतिवादी क्रं. २ चे वारसांनी देखील दि.२९/१२/१९९७ चे खरेदीखताबाबत वाद उपस्थित केलेला नव्हता व नाही त्याचप्रमाणे या प्रतिवादीस दावा मिळकतीची मेहनत मशागत करणेस कधीही अडथळे केले नव्हते व नाही व मिळकतीवर कधीही हक्क सांगितलेला नव्हता व नाही. दि. २९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखता बाबतची माहिती वादींना प्रथम पासून होती व आहे. त्यामुळे दि.२९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखत हे बेकायदा व रद्द बातल आहे व ते वादींवर बंधनकारक नाही तसेच दि.२९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखत लिहून व नोंदवून देणेस मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे ही हजर नव्हती व तिचे ऐवजी दुसरे स्त्रीस उभे करुन कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी खरेदीखत लिहून दिले हे म्हणणे खोटे व लबाडीचे असे असून वादींचे सदरचे कथन सोनूबाई एकनाथ ठाकरे व कचरु लक्ष्मण ठाकरे यांचे मृत्यूनंतर नोदी व खरेदीखताशी विसंगत भूमिका घेणारे असे आहे म्हणून वादींचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१७. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शनी वादींना काहीएक केस नाही न्यायाचे समतोलत्व वादींचे लाभात नाही ते प्रतिवादींच्या लाभात आहे तरी वादीचे दाव्यातील मागणी प्रमाणे वादींचे लाभात मनाई हुकूम देण्यात येऊ नये. वादीचे दाव्यातील मागणी प्रमाणे प्रतिवादी विरुद्ध मनाई हुकूम दिल्यास वादी हे मनाई हुकूमाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्रं. १ हिस दावा मिळकतीची मेहनत मशागत करणेस व तिचे मनमानेल तसा मर्जीप्रमाणे उपभोग घेण्यास बेकायदा व दांडगाईने हरकत अडथळे करतील त्यामुळे या प्रतिवादी क्रं. १ चे कधीही न भरुन येईल असे अपरिमित नुकसान होईल व तिस तिचे न्याय हक्कापासून व मालकी हक्कापासून वंचित व्हावे लागेल. याउलट वादींचे काहीएक

नुकसान होणार नाही अगर गैरसोय होणार नाही तरी वादींचा मनाई अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१८. वादी व प्रतिवादींच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली. वरील परिस्थितीत माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्रं. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींनी आपले म्हणणे सकृतदर्शनी (Prima-facie case ) सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी. |
| २ | न्यायाचे समतोलत्व (Balance of convenience) वादींचे बाजुने आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ३ | तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान (irreparable loss) होणार आहे हे वादींनी सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ४ | कोणता आदेश ? | अंतिम ओदशानुसार . |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्रं. १ ते ४ करीताः–**

१९. उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादींनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे यांचे पतिचे दिनांक २५/०१/१९७१ रोजी मौजे पंचक ता. जि. नाशिक येथे निधन झालेले आहे.

मयत एकनाथ लक्ष्मण ठाकरे यांचे वडिलोपार्जित मिळकतीवर पत्नी सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे, मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे, मुली रक्कमाबाई छबु कोल्हे व दगुबाई खंडू शिंदे अणी नांवे रेकॉर्ड ऑफ राईटसला नोंद क्रं. ७६ प्रमाणे झालेली होती. परंतु मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे, मुली रक्कमाबाई छबु कोल्हे व दगुबाई खंडु शिंदे यांनी त्यांचा हक्क सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे लाभात नोंद नंबर ७८ प्रमाणे सोडुन दिलेला होता. तेव्हापासुन दावा मिळकत ही सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे कब्जे वहिवाटीत होती.

२०. वादीनीच वादपत्रात केलेल्या कथनाप्रमाने मिळकतीवरील हक्क व अधिकार मुलगा विष्णु एकनाथ ठाकरे, मुली रक्कमाबाई छबु कोल्हे व दगुबाई खंडु शिंदे यांनी सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे लाभात नोंद नंबर ७८ प्रमाणे सोडुन दिलेला होता असे कथन केले असल्याने सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हीच मीळकतीची मालक झाली होती याबाबत वाद नाही. दि.२९/१२/१९९७ रोजी दावा मिळकत मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी प्रतिवादी क्रं. १ हिस कायम फरोक्त खरेदीने देऊन मिळकत प्रत्यक्ष कब्जात दिलेवर मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी त्यांचे हयातीत कधीही दि.२९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखताबाबत कधीही वाद उपस्थित केलेला नव्हता व नाही व त्यांचे मृत्यूनंतर वादी व प्रतिवादी क्रं. २ चे वारसांनी देखील दि.२९/१२/१९९७ चे खरेदीखताबाबत वाद उपस्थित केलेला नव्हता व नाही त्याचप्रमाणे प्रतिवादीस दावा मिळकतीची मेहनत मशागत करणेस कधीही अडथळे केले नव्हते व मिळकतीवर कधीही हक्क सांगितलेला नव्हता असे दिसुन येते. प्रतिवादींचे लाभात दि.२९/१२/१९९७ चे खरेदीखत आहे. वादींचा हल्लीचा दावा दि.२९/१२/१९९७ रोजीचे नोंदी व खरेदीखता पासून ३ वर्षांचे मुदतीचे

आत व सोनुबाई एकनाथ ठाकरे या सन २००८ सालात मयत झाली तेव्हा पासून देखील ३ वर्षांचे मुदतीचे आत वादींचा दावा व मनाई अर्ज दाखल नाही. वादीनीच वादपत्रात केलेल्या कथनाप्रमाने मिळकतीवरील हक्क व अधिकार मुलगा व मुलींनी सोनुबाई (सोन्याबाई) ऊर्फ द्रोपदाबाई एकनाथ ठाकरे हिचे लाभात नोंद नंबर ७८ प्रमाणे सोडुन दिलेला होता व त्यामुळे वाददि.२९/१२/१९९७ रोजी दावा मिळकत मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी प्रतिवादी क्रं. १ हिस कायम फरोक्त खरेदीने देऊन मिळकत प्रत्यक्ष कब्जात दिलेवर मयत सोनूबाई एकनाथ ठाकरे व मयत कचरु लक्ष्मण ठाकरे यांनी त्यांचे हयातीत कधीही दि.२९/१२/१९९७ रोजीचे खरेदीखताबाबत कधीही वाद उपस्थित केलेला नसल्याने व खरेदीखत बनावट आहे किवा कसे याबाबत वादीचे बाजुने प्रथमदर्शणी कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. तसेच, वाद मिळकती बाबत अभीलेखावर आलेली कथने ही पुराव्यानंतरच सिध्द होणारी आहे. त्यामुळे, या वेळी वादींनी अभिलेखावर केलेल्या कथनांवरुन वादीची प्रथमदर्शनी केस सिध्द होत नाही. वादीने दावा सन २०१४ मधे दाखल केला व ११ वर्षानंतर या अर्जात वादीची प्रथमदर्शनी केस स्पष्टपणे सिध्द होत नाही. याउलट प्रतिवादींकडे त्यांच्या लाभात नोंदणीकृत खरेदीखत आहे. वादींनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यानुसार वादीची प्रथमदर्शनी केस स्पष्टपणे सिध्द होत नाही व वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आला नाही व त्यामुळे वादी हा तुर्तातुर्त मनाई हूकूम मिळण्यास पात्र ठरत नाही.

२१. वरील विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने नसून न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकताना दिसत नाही. तसेच, जर तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा आदेश पारीत केला तर प्रतिवादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. म्हणुन वरील सर्व बाबींचा विचार करता मी प्रश्न क्रं. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून प्रश्न क्रं. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज नि.क्रं. ०५ नामंजुर करण्यात येतो. |
| 2 | खर्चाबाबत निर्णय अंतिम निकालाच्यावेळी घेण्यात यावा. |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.09.02 14:07:53 +0530

ठिकाण : चांदवड. **(एस. एस. छल्लाणी)**

दिनांक : ०२.०९.२०२५. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चांदवड.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्रं.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०२.०९.२०२५ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०२.०९.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०२.०९.२०२५ |